# 1920 नंतरची कविता : स्वरुप आणि वैशिष्ट्ये

प्रा. डॉ. सुनील म. पवार,
ज. ए. इ. चे महिला महाविद्यालय,
स. वा. जोशी विद्यासंकुल,
डोंबिवली (पूर्व) – 421201.

1920 च्या आसपास मराठी काव्य क्षितिजावर उदयास आलेल्या प्रमुख कवींच्या कार्यकर्तृत्वानंतर आता 1920 ते 1950 या कालखंडातील कवींच्या काव्यनिर्माणकर्तृत्वाने महाराष्ट्र काव्यपरंपरेचे अखंडत्व आजतागायत कायम टिकविले आहे. मराठीतील इतर वाङ्.मयप्रकारांच्या इतिहासाशी तुलना करता असे दिसते की, मराठी कवितालेखनाची परंपरा सर्वात जास्त असून ती गेल्या शेकडो वर्षात अखंड राहिलेली आहे. प्राचीन व अर्वाचीन कालखंडात मराठी काव्यनिर्मितीला मधूनमधून ओहोटी लागलेली असल्यामुळे तिची निर्मिती प्रक्रिया मंदावलेली वाटते. आधुनिक मराठी काव्याचा इतिहास पाहता असे दिसते की, दर पंधरा वर्षांनी मराठी कवितेच्या प्रवाहास नवा वेग प्रकट झालेला आहे. (1) 1885 ते 1905 (2) 1905 ते 1920 (3) 1920 ते 1935 (4) 1935 ते 1950 व 1950 पासून पुढे सुरु झालेला असे पाच कालखंडात याचे वर्गीकरण होऊ शकेल.

पहिल्या कालखंडाचा प्रारंभ केशवसुतांच्या पहिल्या कवितेच्या लेखन वर्षाने झाला असून त्याची अखेर केशवसुतांच्या शेवटच्या कवितेच्या लेखनवर्षात मानलेली आहे. केशवसुत, रे. वा. ना. टिळक, विनायक, माधवानुज व दत्त हे या कालखंडातले मुख्य मानकरी. दुसऱ्या कालखंडातील मुख्य कर्तबगारी गोविंदाग्रज, बालकवी व कवी बी यांची. या कवींची वृत्ती बरीचशी सौदर्यवादी होती.

तिसऱ्या कालखंडातील काव्यसृष्टी रविकिरणमंडळ, तांबे व चंद्रशेखर यांच्या दीप्तीने उजळून निघालेली आहे. इंग्रजी काव्याच्या अभ्यासाने आणि प्रभावाने केशवसुतांच्या पहिल्या पिढीत मराठी कवितेत आशयविषयक आणि अभिव्यक्तीविषयक जी नवी विविधता आली तिच्यात आणखी भर घालून रविकिरणमंडळाने तिला स्थिरपद दिले.

1935 नंतर मराठी कवितेतील समाजाभिमुखता ही कुसुमाग्रज व अनिल यांच्या प्रयत्नांमुळे क्रांतीच्या जयजयकाराने आणि मानवतेच्या उद्घोषाने दुमदुमू लागली. या दोघा

श्रेष्ठ कवींबरोबर वा.रा. कान्त व श्रीकृष्ण पोवळे यांनीही क्रांतीची गीते गायली. ना. घ. देशपांडे आणि बा.भ. बोरकर यांच्या प्रतिभेचा व्यापार मुख्यत्वेकरुन सौंदर्यवादी स्वरुपाचाच राहिला. 1947 ते 1950 च्या दरम्यानच्या काळापासून मराठी कवितेतील समाजाभिमुखता अधिक तीव्र, अधिक व्यापक व अधिक वास्तव होण्याचे चिन्हे प्रकट होऊ लागली. 'नवी मळवाट', 'काही कविता', 'विश्वमानस', 'युगायुगाचे सहप्रवासी' या कृती त्या दृष्टीने उल्लेखनीय आहेत. विं. दा करंदीकर व वसंत बापट यांनीही अलिकडे समाजाभिमुख कवि म्हणून लौकिक मिळविलेला आहे. मंगश पाडगांवकरांच्या प्रतिभेला मात्र सामाजिकतेपेक्षा सौंदर्यवादाचे आकर्षण जास्त आहे.

यावरुन असे दिसते की, केशवसुतांपासून मुक्तिबोधापर्यंतच्या कवितांत समाजलक्ष्यी आणि सौंदर्यलक्ष्यी असे दोन ठळक प्रवाह सतत वाहत राहिलेले आहेत. समाजलक्ष्यी आणि सौंदर्यलक्ष्यी या संज्ञा अर्थातच 'प्राधान्येन् व्यपदेशः भवति' या धोरणास अनुसरुन वापरलेल्या आहेत. समाजलक्ष्यी प्रवाहांत जवळ जवळ अविरतपणे मानवतावादाव्या पुरस्काराचा धागा स्पष्टपणे राहिलेला आहे. या मानवतावादी वैचारिक बैठक प्राप्त करुन देऊन ती उत्तरोत्तर अधिक संपन्न बनविण्याचे श्रेय मुख्यतः अनिल (निर्वासित चिनी मुलास), मुक्तिबोध (नवी मळवाट), ना. ग. जोशी (विश्वमानस) यांना देणे आवश्यक आहे.

1920 ते 1950 पर्यंतच्या मराठी कवींच्या सौंदर्यलक्षित्वाच्या वृत्तीलाही चांगला रम्य बहर आलेला आहे. त्यातही पुन्हा रसिकचित्तमधुपांस त्यांच्या प्रेमगीतांनी आणि निसर्गगीतांनी विशेष करुन उत्कृष्ट केलेले आहे. प्रस्तुत कालखंडातील प्रेमगीतांतून सफल व विफल प्रतिच्या पोटी येणाऱ्या अनेक परींच्या मृदु, मुग्ध, मधुर, मादक व मोहक अनुभवांचे कुशल चित्रण करण्यात आलेले आहे. अर्वाचीन मराठीतील विविध कवितांप्रकारात सर्वात जास्त प्रतीतिपूर्ण आणि सर्वात जास्त कलापूर्ण अशी जर कोणती कविता लिहिली गेली असेल तर ती प्रेमकविता. या कालखंडातील सामान्य कवींच्या प्रेमकविताही रसिकमनास चटका लावण्याइतक्या रसोत्कट उतरल्या आहेत.

काही कविंनी निसर्गाच्या कधी रम्य, कधी रुद्र, स्वरुपाच्या दृश्यांच्या माध्यमातून आपली प्रेमभावना प्रभावीरितीने आविष्कृत केलेली आहे. निसर्गाचा उल्लेख केल्यानंतर प्रस्तुत कालखंडातील बोरकर, निकुंब, शांताबाई शेळके, पाडगावकर अशी डोळयापुढे येणारी अनेक

नावे लक्षात घेऊनही असे म्हणावेसे वाटते की, आधुनिक मराठीत निसर्गगीतांची निपज एकंदरीत कमीच आहे.

प्रेम आणि निसर्ग यांच्याप्रमाणे ईश्वर हाही आजच्या कविप्रतिभेचे एक स्फूर्तिस्थान राहिलेला आहे. परंपरागत स्वरुपाच्या ईश्वरविषयक कवितेची निर्मिती आजतागायत अव्याहत सुरु आहे. तिच्या बाबतीत वैषम्य एवढेच वाटते की, साहित्यिकांच्या मेळाव्यातील चर्चाविषय होण्याचे भाग्य न लाभल्यामुळे तिचा फारच कमी बोलबाला झालेला आहे. संतवाणीच्या अमर प्रभावामुळे आणि ईश्वरभक्ती हे मानवी मनाचे एक अमर स्फुरण असल्यामुळे भक्तीमार्गी कवितेचा प्रवाह हा असाच अखंड वाहत राहणारा आहे.

आधुनिक मराठी कवितेच्या इतर बऱ्याच प्रकारांप्रमाणे अतींद्रियवादी कवितेच्या आद्य प्रवर्तनांचेही श्रेय केशवसुतांचेच आहे. कुसुमाग्रजांच्या अलीकडच्या काही कवितांचा कानोसा घेतल्यास त्यातून त्या अस्वस्थतेचा अस्पष्ट सूर ऐकू येण्यासारखा आहे. अतींद्रियार्थाची आच आपल्या बुद्धीला लागावी असे मागणे मर्ढेकरांनी परमेश्वराजवळ मागितले आहे. अध्यात्मिक अंतर्मुखतेला आजच्या कवींचे मन प्रायः अनुकूल नसल्यामुळे, या प्रकारच्या कवितेची निर्मिती अत्यल्प राहणेच क्रमप्राप्त आहे.

नवकाव्याच्या धावत्या परामर्षानेच याचा समारोप करावयाचा आहे. केशवसुतांनी एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशक, दीड दशकांत इंग्रजी काव्यांतील काही प्रवृत्तींची मराठीत आयात केल्यामुळे जशी आधुनिक मराठी कविता जन्मास आली तसाच प्रकार नवकाव्याच्या जन्माच्यावेळी झाला आहे. नवकवि हे बिरुद ज्यांना यथार्थतेने लावता येईल असे बा.सी. मर्ढेकर, य.द. भावे व शरदच्चंद्र मुक्तिबोध हे तीन प्रमुख कवि आहेत. त्यातही नवकाव्याचा खरा दरारा मर्ढेकरांच्या 'काही—कविता' या संग्रहाने बसविला आहे. या संग्रहाचे 1947 हे प्रकाशनवर्ष, त्यालाच नवकाव्याचा प्रारंभकाल मानणे सोयीचे आणि संयुक्तिक आहे. नवकाव्यातील मुख्य प्रवृत्तीच्या प्रेरक वैचारिकतेच्या उगमस्थानाचा मागोवा घेतला असता तिच्याशी स्पष्टपणे सुसंवादी असा सूर इलियट व ऑडेन या पाश्चात्य कवींच्या काव्यात आढळण्यासारखा आहे. तिकडे पश्चिमेकडे नवकाव्याचे निशाण विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकांत फडकले.

'दी टॉवर' या संग्रह रुपाने नवे निशाण नजरेस आले. या संग्रहातून कीटस्, एझरा, पौंड व विशेषतः इलियट यांनी रोमॅन्टेसिझम म्हणजे स्वच्छंदतावादाविरुध्द बंड उभारले. आणि

वास्तवतावादाला उचलून धरले. या नव्या रोपट्यावर इलियटने बॉदलेर प्रभृति फ्रेंच कवींपासून घेतलेले प्रतिकवादाचे नवे कलम बसविले. इलियटच्याच प्रयत्नामुळे इंग्रजी काव्याला नव्या संस्काराचे, नव्या अभिव्यक्तीचे, नव्या आशयाचे नवे लेणे लाभले. प्रगतिशील राजकिय विचारसरणीच्या काही ऑक्सफर्ड कवींनी ऑडेनच्या नेतृत्वाखाली एकत्र येऊन 1930 साली एक नवा पंथ काढला. दुसरे महायुद्ध सुरु झाल्यानंतर ऑर्डेनगटांतून बाहेर पडलेल्या काही कवींनी नव्या स्वच्छंदतावादाचा व अर्ध अतिवास्तवतावादाचा पुरस्कार केला, तिकडच्या नवकाव्यातील या काही नव प्रवृत्तींचे आपल्याकडील नवकाव्यांत काही पडसाद उमटले. आंधळे आणि निर्बुद्ध अनुकरण असे अर्थातच या पडसादांचे स्वरुप नव्हते. केशवसुतांना, त्यांनी आपल्या काळी चाललेल्या इंग्रजी कवितेतून जीवनाकडे पाहण्याबाबत आणि आपल्या जीवनानुभूतीला अभिव्यक्त करण्याबाबत, जशी नवी दृष्टी प्राप्त झाली, त्याचप्रमाणे आजच्या नवकवींना आजच्या इंग्रजी कवींपासून नवी दृष्टी मिळाली. ती आत्मसात करुन आपल्या नवकवींनी स्वतंत्र स्वरुपाची नवकाव्यनिर्मिती केली.

मराठी कवितेने आजपावेतो तिच्या स्वरुपांत अनेक परिवर्तने अनुभवली आहेत. नवकाव्य हे त्यातलेच आणखीन एक परिवर्तन. या नवेपणाची सांगण्यात आलेली काही व्यवच्छेदक लक्षणे अभ्यासणे आवश्यक आहे. बोधमनाबरोबर अबोध मनाच्या सूक्ष्म हालचाली टिपणे हे नवेपणाचे एक लक्षण आहे. मनोविज्ञानाचा आश्रय घेऊन जीवनाचे जरा जास्त खोलवर जाऊन वस्तुनिष्ठ दर्शन घेण्याचा प्रयत्न आहे. मुक्तिबोधांच्या मते, "समाजप्रवण, समाजास बदलू पाहणारी वैचारिक बैठक, प्रतिमेचा उपयोग निव्वळ अलंकारासाठी न करता वास्तवतेचे प्रकटीकरण करण्यासाठी प्रतिमांचा उपयोग करण्यावर भर. त्याचबरोबर मुक्तिबोधांनी मुक्तछंद हा एक विशेष सुचविला आहे. समाजास बदलू पाहणारी वैचारिक बैठक, ही तर शेकडो वर्षाची परंपरा असण्याइतकी जुनी गोष्ट आहे. या परंपरेला अलिकडचा दुवा केशवसुतांचा आणि पुष्कळ पलीकडचा दुवा ज्ञानेश्वरांचा. मुक्तिबोधांनी नवकाव्याची परंपरा, पुरोगामी वैचारिक बैठकीच्या लक्षणापुरती तरी थेट ज्ञानेश्वरापर्यंत नेऊन पोहचवली आहे.

आता राहिले लक्षण प्रतिमांचे. 'नव्या भावनानिष्ठ समतानता' या मर्ढेकरांनी सांगितलेल्या नवकाव्याच्या व्यवच्छेदक लक्षणात 'नव्या प्रतिमासृष्टीचा उपयोग' हाच अर्थ स्थूलमानाने अभिप्रेत आहे. प्रतिमा म्हणजे अलंकार नव्हेत. अलकांरात बाह्योपाधित्व आहे. अलंकाराचे साम्य भूषणांशी नव्हे तर स्त्रीच्या विभ्रमाशी दाखविले तरीसुद्धा विभ्रम हे देहाच्या स्वाभाविक

स्थितीचे निदर्शक नसल्यामुळे, त्याचे बाह्योपाधित्व कायम राहणार आहे. प्रतिमेची जन्मप्रक्रियाच भिन्न आहे. नवकवींच्या मनातला आशय विशिष्ट अर्थगर्भ प्रतिमारुपानेंच उदयास येत असल्यामुळे आशय आणि प्रतिमा यांत एकप्रकारे अव्दैत नांदत असते.

समष्टीच्या सुखदुःखाशी आणि आशा–आकांक्षाशी व्यापक व सखोल जाणिवेने समरस होण्यासाठी नवकाव्याची चाललेली धडपड पाहता महाराष्ट्राच्या शेकडो वर्षाच्या परंपरेशी नाते सांगणारा दुवा प्राप्त झाल्याचे दिसून येते. नवकाव्यात आलेली वेगवेगळी स्थित्यंतरे, त्याविषयीची समीक्षकांची भूमिका या सगळयातून नवकाव्य ही परंपरा पुढेही अशीच चालू राहणार आहे. 'नवकाव्य' हे नाव त्याला जरी लाभले असले तरी त्याच्यानंतर येणाऱ्या कालखंडावर देखील या नवकाव्याचाच प्रभाव दिसून येईल. स्वच्छंदतावाद, अभिजातवाद, सौंदर्यवाद हे काव्याला लाभलेले विशेष आहेत. यातूनच पुढे येणारे काव्य घडणारे आहे. या वादांना डावलून काव्यातील रस काढून टाकल्यासारखे होईल म्हणूनच हे वाद काव्याचे जीवनांग आहे. नवकाव्याचे विशेष, ते निर्माण होण्यामागील प्रेरणा, नवकाव्याचे स्वरुप, नवकाव्यातील महत्वाचे कवी, नवकाव्याविषयी साहित्यिकांनी घेतलेली भूमिका, नवकाव्याची वैशिष्ट्ये व समारोप या सर्वातून नवसाहित्य व नवकाव्य या दोहोंचा हा थोडक्यात घेतलेला आढावा.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

1. अर्वाचीन मराठी वाड्.मयाचा इतिहास (1800 – 1960) : प्र. न. जोशी
2. आधुनिक मराठी वाड्.मयाचा इतिहास (भाग दुसरा) : अ. ना. देशपांडे
3. मराठी साहित्यः प्रेरणा व स्वरुप (1950–1975) : गो. मा. पवार, म. द. हातकणंगलेकर
4. प्रदक्षिणा (खंड दुसरा) इ.स.1947 ते 2000 : अनिरुद्ध अनंत कुलकर्णी